महत्वाचे

जा.क्र.उमाशि-३/पुवि/इ.१२ वी प्रवेश/२०१४-१५ /९८३२
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे १ यांचे कार्यालय
दिनांक: ~~- 6 MAY 2014~~ - 5 MAY 2014

प्रति,

प्राचार्य/मुख्याध्यापक,

----------------------------------

----------------------------------

विषयः शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये इयत्ता १२ वी प्रवेशासाठी अंमलात आणावयाच्या कार्यपध्दतीबाबत......

उपरोक्त विषयाबाबत विद्यार्थी, पालक व विविध शैक्षणिक संस्था आणि संघटना या कार्यालयाकडे इयत्ता १२ वी वर्गात प्रवेशाबाबत लेखी पत्रान्वये व तोंडी विचारणा करतात. इयत्ता १२ वी वर्गात प्रवेश पात्र विद्यार्थ्याला नियमाप्रमाणे रिक्त जागेवर प्रवेश देण्याचे काम आपले कनिष्ठ महाविद्यालयाचे स्तरावरुन होत असते. त्यासाठी या कार्यालयाची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता नाही याची नोंद घ्यावी.

इयत्ता १२ वी प्रवेशाबाबत खाली दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन आपल्या स्तरावरुन नियमाप्रमाणे गुणवत्तेनुसार पात्र विद्यार्थ्यास रिक्त जागांच्या मर्यादेत प्रवेश देण्यात यावेत. त्याकरिता या कार्यालयाशी वेगळा पत्रव्यवहार करुन परवानगी घेण्याची आवश्यकता नाही.

इयत्ता १२ वी प्रवेशासाठी मागणी करणारा विद्यार्थी स्थानिक कनिष्ठ महाविद्यालयातून इयत्ता ११ वी पास असू नये म्हणजेच इयत्ता १२ वी प्रवेश हा स्थानिक परिसरातील (पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील) असल्यास अमान्य होईल याची नोंद घ्यावी.

अटी

१. शाखा बदल/अभ्यासक्रम बदल व माध्यम बदल करुन एखाद्या विद्यार्थ्यास इयत्ता १२ वी मध्ये आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश हवा असल्यास असा प्रवेश नियमानुसार मान्य करता येईल.

२. इयत्ता १२ वी मध्ये बदलीने आलेल्या विद्यार्थ्यांना अथवा पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राबाहेरील विद्यार्थी प्रवेश मान्य होईल.

उपरोक्त १ ते २ अटींचे अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये कनिष्ठ महाविद्यालयीन इयत्ता १२ वी वर्गात प्रवेशाबाबतचे काम आपल्या स्तरावरुन करण्यात यावे. इयत्ता १२ वी प्रवेशाबाबत या कार्यालयाची लेखी अथवा तोंडी सहमती आणणेबाबत विद्यार्थ्यास/पालकांस या कार्यालयाकडे पाठवू नये.

सदर परिपत्रक या कार्यालयाच्या (**www.dydepune.com**) या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

5/5/14

(सुमन शिंदे)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.